**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र. रामाआ/ ५१३० /२०१७/कोल्हापूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,**
**नवीन प्रशासकीय इमारत,**
**विधान भवना समोर, पुणे - १**

श्री.महेंद्र सिंह — अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर, पुणे-४११००५ — उत्तरवादी

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधिश,
जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे-४११००५

**द्वितीय अपील सुनावणी दिनांक-२२/१२/२०२१**

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकारी यांचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १०/०५/२०१७ | --- | २३/०६/२०१७ | --- |

अपिलार्थी यांनी दि. दि.०१/०९/२०१७रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले.

प्रस्तुत द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना सुनावणीचे सूचना पत्र पाठवून संबंधितांनी Google Meet या व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमाद्वारे सुनावणीस उपस्थित रहावे, असे कळविले.

त्यानुसार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी, विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी व तत्कालिन जन माहिती अधिकारी मयत असून तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी सेवानिवृत्त आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जोडपत्र 'अ' मध्ये जन माहिती अधिकारी यांचे कडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

'J.M.F.C. Court, Pune येथे दाखल दावा क्र. ४०११०४/२०१५ या केसची २ मुद्यांची माहिती'

तदनंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र 'ब' मध्ये 'माहिती/उत्तर दिले नाही' असे प्रयोजन नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की,

१) अपिलार्थीचा माहिती अर्ज दिनांक १०/०५/२०१७ रोजीचा असून तो जन माहिती अधिकारी, J.M.F.C. Court, Pune यांचेकडे केलेला आहे. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले आहे.

२) सुनावणीचेवेळी प्रभारी जन माहिती अधिकारी यांनी असे सुचित केले की, अपिलार्थीस दिनांक ०५/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये आर.सी.सी.नं.४०११०१/२०१५ च्या सद्यस्थिती बाबतच्या माहितीच्या दोन पानांची माहिती पुरविली आहे.

३) अपिलार्थीचे प्रथम अपिल दि.२३/०६/२०१७ रोजीचे असून त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.११/०८/२०१७ रोजी आदेश दिला असून त्यामध्ये प्रथम अपिल फेटाळले आहे.

४) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील आदेश पारीत केला आहे, परंतु आदेशाची अमंलबजावणी झाली किंवा कसे याबाबत खात्री करणे आवश्यक होते परंतु तसे केले नाही. त्यामुळे अपिलार्थी परिपुर्ण माहितीपासुन वंचित राहिलेले आहेत.

सदर प्रकरणी कार्यवाही पुर्ण झाली आहे, तथपि, आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अर्जदाराने न्यायालयीन प्रकरणाच्या आदेशाच्या प्रतिबाबत कोर्टात नियामप्रामणे अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

२) जिल्हा न्यायाधिश, पुणे यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र. दिनांक -

<u>प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-</u>

१. मुख्य न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे-४११००५

यांना कळविण्यांत येते की, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.केमाअ-२००८ /६८८/प्र.क्र.२१९/०८/९ (मा.अ.) दि.१०/०६/२००८ मधील सुचनानुसार सदर प्रकरणी आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

[illegible]